# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com   दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४   email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./७६८३ /२०२१ दि. २९/११/२०२१

## परिपत्रक

विषय :- महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालीक स्पर्धा आयोजित करणेबाबत.

संदर्भ :- १. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान यांचे दि. ११/११/२०२१ रोजीचे पत्र.

२. महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र.उशिस/नियत स्पर्धा/०४२१/ प्रक्र-०२/ मवि-१/१३४०८, दि. १५/११/२०२१.

३. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र उशिनाग/आस्था/सर्व महा./७५४०/२०२१, दि. १८/११/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांना याव्दारे कळविण्यात येते की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व नवमहाराष्ट्र युवा अभियान व उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालीक स्पर्धा (College Souvenir) आयोजित केली जाते. साहित्य क्षेत्रात नवनवीन सकारात्मक प्रवाह येवून राज्यातील युवांमध्ये साहित्याबाबत आस्था व पुरोगामी विचारांची रुजवणूक व्हावी, हे या उपक्रामचे उद्दीष्ट्ये आहेत.

या स्पर्धेचे पारितोषिक राज्यस्तरीय पातळीवर तसेच विद्यापीठ स्तरावर दिले जाते. राज्यस्तरावर आयोजित होणारी महाविद्यालयीन नियतकालीक ही एकमेव स्पर्धा असून राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये या स्पर्धेची माहिती पोहचविण्याचा उद्देश आहे.

त्याअनुषंगाने सर्व संबंधितांनी संदर्भिय पत्रांचे अवलोकन करुन त्यानुसार नोंद घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

२६.११.२०२१

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.
४. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. गोंडवाना विद्यापीठ, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.jdnagpur.in
E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com
फोन नं. ०७१२-२५६१७१३ फॅक्स न. ०७१२-२५५४२१०

क्रमांक : उशिनाग/आस्था/सर्व महा./7540/२०२१ दिनांक : 18/11/2021

प्रति,

१. कुलसचिव,
रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/
कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ युनिवरसिटी, नागपूर.

२. संचालक/प्राचार्य/वसतीगृह प्रमुख
सर्व शासकीय संस्था/महाविद्यालय/वसतीगृह,

३. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विना अनुदानित महाविद्यालये,

**विषय : महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ : १. निलेश राऊत, संघटक, नवमहाराष्ट्र युवा अभियान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचे दि.११ नोव्हेबर, २०२१ रोजीचे पत्र**
**२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/नियत स्पर्धा/०४२१/प्र.क्र.०२/मवि-१/१३४०८, दि.१५.११.२०२१**

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. (प्रत सोबत जोडलेली आहे.)

नागपूर विभागातील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतिगृहे, अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल संचालनालयास व या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सहपत्र : संदर्भिय पत्र

(डॉ.संजय ठाकरे)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत : १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in
E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन न.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११११५३

क्र-उशिसं नियत.स्पर्धा/-०४२१/प्र.क्र.०२/मवि-१/ 13408 दिनांक १५.११.२०२१

प्रति,

१.सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.
२.कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

आवक क्र. 2548 15 NOV 2021
कार्यालय, उच्च शिक्षण सहसंचालक, ...
दिनांक 16/11/2021

**विषय - महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालीयीन नियतकालीक स्पर्धा आयोजित करणेबाबत**

संदर्भ-निलेश राऊत,संघटक,नवमहाराष्ट्र युवा अभियान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांचे दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रानुसार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व नवमहाराष्ट्र युवा अभियान व उच्च शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने, यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा (**Collage Souvenir**) स्पर्धा आयोजित केली जाते.साहित्यक्षेत्रात नवनवीन सकारात्मक प्रवाह येवून राज्यातील युवांमध्ये साहित्याबाबत आस्था व पुरोगामी विचाराची रूजवणूक व्हावी हे या उपक्रमाचे उद्दिदष्ट आहे.

या स्पर्धचे पारितोषिक राज्यस्तरीय पातळीवर तसेच विद्यापीठ स्तरावर दिले जाते. राज्यस्तरावर आयोजित होणारी महाविद्यालयीन नियतकालीक ही एकमेव स्पर्धा आहे. राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये या स्पर्धेची माहिती पोहचवण्याच्या उददेश आहे. प्रत संलग्न

तरी या स्पर्धेची माहिती आपल्या अधिनस्त सर्व अकृषी /अभिमत / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे तसेच अधिनस्त शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालये / मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतिगृहे व परीसंस्था यांना कळविण्यात यावे व एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत-श्री.निलेश राऊत,संघटक,नवमहाराष्ट्र युवा अभियान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

शिक्षण संचालनालय,
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१
1 NOV 2021
आवक क्रमांक : 9(0039
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

मुख्य कार्यालय : यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०२१.
दूरध्वनी : ०२२०२ ८५९८, २२८५ २०८१, फॅक्स : ९१-२२-२२८५ २०८२.
E-mail : navmaharashtra@gmail.com, Website : www.ycpmumbai.com

अध्यक्ष
शरद पवार
उपाध्यक्ष
अरुण गुजराथी
कार्याध्यक्ष
सुप्रिया सुळे
सरचिटणीस
श. गं. काळे
खजिनदार
हेमंत टकले
नवमहाराष्ट्र युवा अभियान
निमंत्रक
सुप्रिया सुळे
संयोजक
दत्ता बाळसराफ
सहसंयोजक
विश्वास ठाकूर
विजय कान्हेकर
संघटक
नीलेश राऊत

दिनांक: ११ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
मा. डी.आर. माने,
संचालक,
उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य,

**विषय: महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने यशवतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा आयोजित करणेबाबत...**

महोदय,
सविनय नमस्कार,

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईनवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने दरवर्षी महाविद्यालयीन नियतकालिक (Collage Souvenir) स्पर्धा आयोजित केली जाते. साहित्य क्षेत्रात नवनवीन सकारात्मक प्रवाह येऊन राज्यातील युवांमध्ये साहित्याबाबत आस्था व पुरोगामी विचारांची रुजवणूक व्हावी, हेया उपक्रमाचे उद्दिष्टे आहे. राज्यातील विद्यार्थ्यांच्या विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब असंख्य महाविद्यालयीन नियतकालिकांमध्ये पडलेले पहावयास मिळते. या नियतकालिकांमध्ये आपले लेख, कवितालिहिणाऱ्याविद्यार्थ्यांमधूनच उद्याचे साहित्यिक घडत असतात. युवाना आपले मत मांडायची संधी देताना त्यांच्यातील कलागुणांना वाव देणाऱ्या नियतकालिकांचेमहत्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट नियतकालिकांचा सन्मान करणारा हा महराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे.

या स्पर्धेचे पारितोषिक राज्यस्तरीय पातळीवर तसेच विद्यापीठ स्तरावर दिले जाते. राज्यस्तरावर आयोजित होणारी महाविद्यालयीन नियतकालिक ही एकमेव स्पर्धा आहे. राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये या स्पर्धेची माहिती पोहोचविण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागासमवेतआयोजित करण्याचे प्रस्तावित करत आहोत.

या स्पर्धेचा संपूर्ण खर्च हा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईच्या वतीने करण्यात येईल. आपल्या विभागाच्या वतीने या स्पर्धेची संपूर्ण माहिती राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात पोहोचविण्यात यावी व ही स्पर्धा आपल्या विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात यावी ही नम्र विनंती.

धन्यवाद..!

आपले स्नेहांकित,

(दत्ता बाळसराफ)
मानद कार्यक्रम व्यवस्थापक
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

(नीलेश राऊत)
संघटक, नवमहाराष्ट्र युवा अभियान,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय: मा.ना.उदयजी सामंत, मंत्री, उच्चव तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.